30 MAR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञान, अनुभवाच्या शिदोरीवर आव्हानांना सामोरे जा

## डॉ. मधुकर बाचुळकर यांचा सल्ला : दूधसाखर महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
सरवडे

जीवनामध्ये शिक्षणाबरोबर अनुभव महत्त्वाचा आहे. जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा पदवीधरांनी पूर्ण केला आहे. स्वावलंबनाचा धडा घेवून पुढे गिरवावा. ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या शिदोरीवर जीवनाच्या आव्हानांना सामोरे जावे असे प्रतिपादन जेष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केले.

बिद्री ता. कागल येथील दूधसाखर महाविद्यालयात आयोजीत केलेल्या पहिल्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी बिद्री साखर कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील होते.



बिद्री : पदवीदानप्रसंगी पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर, माजी आमदार के. पी. पाटील व इतर.

डॉ. बाचुळकर म्हणाले, महाविद्यालयाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांनी स्वावलंबीपणाने व सजगपणे जीवनात मार्गक्रमण करावे. महाविद्यालयीन जीवन ही शिदोरी आहे. ही शिदोरी शिक्षक आणि पालकांनी तुम्हाला दिलेली देणगी आहे. समाजाचे ऋण फेडण्यासाठी सज्ज असायला हवे. नोकरीच्या मागे न लागता नोकरी देणारे बनावे. देश हितासाठी युवकांचे योगदान महत्वाचे आहे.

अध्यक्ष पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणाची व्यवस्था करण्याचा चांगला निर्णय शिक्षण मंडळाने घेतला. त्याचे सार्थक झाले असून उद्याच्या बलशाली भारताच्या सेवेसाठी आपण वाहून घ्यावे. यश अपयशाची तमा न ठेवता येणाऱ्या संकटांना सामोरे गेल्यास ध्येयापर्यंत पोहचता येईल.

याप्रसंगी महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शिवाजी विद्यापिठाच्या शारिरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. उलपे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. प्रकाश कुंभार, डॉ. आर. एल. राजगोळकर, शिक्षण संस्थेचे संचालक दत्तामामा खराडे, अशोक कांबळे, सचिव एस. ए. कुलकर्णी, एम. के. भोईटे, आनंदराव पाटील, पी. व्ही. पाटील, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. आनंद वारके यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. अनिल माने यांनी केले. आभार डॉ. एन. डी. पाटील यांनी मानले.

30 MAR 2019 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यश म्हणजे आपल्या दृष्टिकोनाचा परिणाम

## शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांचे प्रतिपादन


प्रतिनिधी
इचलकरंजी

यश म्हणजे योगायोग किंवा अनपेक्षित घटना नव्हे तर आपल्या दृष्टीकोनाच्या परिणामाचे फलित असते असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डी.आर. मोरे यांनी केले. येथील व्यंकटेश महाविद्यालयाच्या पहिल्या पदवीदान समारंभ्यत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

ते म्हणाले, महाविद्यालयात प्रथम वर्गात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी आपलं ध्येय धोरण ठरवले पाहिले आणि त्यासाठी उपलब्ध साधनांचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. शासन दरबारी, विद्यापीठ पातळीवर काही प्रयोग राबवले जातात त्याला आपण सर्वांनी पाठींबा देण्याची मागणी केली. स्तरावर पदवीदान समारंभ घेण्यापेक्षा प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांचे कौतुक पालकासमोर करणे गरजेचे आहे. त्याचाच हा एक भाग आहे. मनुष्य आयुष्यभर शिकत असतो. नवनवीन ज्ञान घेत असतो त्यामध्ये विविध टप्पे पार करून आपल्या आयुष्याचा मार्ग सोपा करावा.

सामाजिक प्रश्नांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींनी लक्ष घातले. पर्यावरणाचा समतोल संभाळला तर पालकांच्या, शिक्षकांच्या कष्टाचे सार्थक होईल असे ते म्हणाले. राजर्षी शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. खिलारे यांनीही यावेळी आपले विचार मांडले. संस्थेचे चेअरमन हरीष बोहरा यांनी मनोगत व्यक्त केले.

सुत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. शुभांगी अरडीकर, मोहिनी आचलिया, मोनिका पाटील यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. घरपले यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



इचलकरंजी : येथील व्यंकटेश महाविद्यालयाच्या पदवीदान प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डी. आर. माने, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खिलारे, संस्थेचे चेअरमन हरीष बोहरा यांचेसह विद्यार्थी.

30 MAR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दत्तक विधान सोहळ्याने शाहूंच्या रूपाने लोकराजा लाभला

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकीकत' पुनर्मुद्रीत पुस्तकाचे प्रकाशन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताच्या इतिहासात १८८४ मध्ये कोल्हापूर संस्थानात झालेल्या दत्तक विधान सोहळ्याला अनन्यसाधारण असे महत्व आहे. या दत्तक विधान सोहळ्याने कोल्हापूर संस्थानला केवळ आपला राजा मिळाला नाही तर संपूर्ण देशाला विकासाची दृष्टी देणारा, समतेचा विचार देणारा आणि जातीअंतांचा कृतीशिल आग्रह धरणारा लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या रूपाने रयतेचा राजा मिळाला. अशा या राजाच्या दत्तक विधानाची माहिती देणारे 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकीकत' हे पुस्तक महत्वाचा ऐतिहासिक दस्ताऐवज असून इतिहासाच्या अभ्यासकांसह नव्या पिढीला ऊर्जा देणारे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



कोल्हापूर : श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकीकत या पुनर्मुद्रीत पुस्तकाचे शुक्रवारी प्रकाशन झाले. यावेळी डावीकडून डॉ. अरुण भोसले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. बी. डी. खणे व प्राचार्य डॉ. विलास पोवार.

संस्थान काळात 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकीकत" हे पुस्तक सदाशिव देशपांडे यांनी १८८५ मध्ये लिहिले होते. तब्बल १३५ वर्षांनी या पुस्तकाचे पुनर्मुद्रण करून प्रकाशन करण्याचे मोलाचे कार्य प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी केले. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ शुक्रवारी येथील शाहू स्मारक भवनमधील मिनी हॉलमध्ये झाला. अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार वसंत भोसले होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, १८८४ साली झालेले दत्तकविधान सोहळा नेमका कशा पद्धतीने झाला. भविष्यातील पिढीला या सोहळयाची आणि त्यामागच्या उद्देशाची माहिती मिळावी, या हेतूने सदाशिव देशपांडे यांनी पुस्तक लिहिले आहे.


वसंत भोसले, डॉ. अरुण भोसले, प्राचार्य डॉ. विलास पोवार, डॉ. बी. डी. खणे यांनी मनोगत व्यक्त केले. पुस्तकाचे संपादक प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी पुस्तक पुनर्मुद्रीत करताना आलेल्या अडचणी यांची माहिती दिली. ॲड. अजित चव्हाण यांनी आभार मानले.

# जल साक्षरता के लिए विश्वविद्यालय आगे आएं

## जल पुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा का प्रतिपादन

संवाददाता

**कोल्हापुर.** ऐसा कहा जाता है कि तीसरा विश्व युद्ध पानी की समस्या को लेकर होगा. इस स्थिति से अगर हमें बचना है, तो विश्वविद्यालय जलसाक्षरता बढाने के लिए आगे आएं, ऐसा प्रतिपादन वरिष्ठ जल विशेषज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा ने किया. शिवाजी विश्वविद्यालय तथा एसोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स एन्ड इंजीनियर्स कोल्हापुर के संयुक्त तत्वावधान में 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' यानी पंच गंगा के लिए जागो इस मुहिम के तहत विश्व जलदिवस के मौके पर व्याख्यान आयोजित किया गया.



इस व्याख्यान में डॉ. राजेंद्र सिंह ने संबोधित किया. विश्वविद्यालय के राजर्षी शाहू सभागृह में हुए कार्यक्रम की अध्यक्षता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे ने की.डॉ. राजेंद्र सिंह ने कहा कि, महाराष्ट्र में आज के समय जलसाक्षरता का बेहतरीन काम किया जा रहा है. इस मुहिम के तहत राज्य में कई गांव पानी की किल्लत से बच गए. आज सबसे अधिक बांध महाराष्ट्र में है. इसके बावजूद भी महाराष्ट्र में किसानों की आत्महत्याएं कम नहीं हो रही है. मजदूरों का बड़ी संख्या में इसलिए जलसाक्षता की इस मुहिम और व्यापक बनाने के लिए विश्वविद्यालय आगे आएं. शिवाजी विद्यालय समेत राज्य में राष्ट्रीय सेवा योजना, भूगर्भशास्त्र और बाकी सभी विषयों से संबंधित छात्रों के गुट अपने-अपने कार्यक्षेत्र के महाविद्यालयों में जलसाक्षरता के विषय में जनजागृति मुहिम चलाएं.

## जलदिवस के मौके पर व्याख्यान आयोजित

कुलगुरु शिंदे ने विश्वविद्यालय में चल रहे विभिन्न उपक्रमों की विस्तार से जानकारी दी. कार्यक्रम को कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, तकनीकी अधिविभाग के संचालक डॉ. जे. एस. बागी, एसोसिएशन के अध्यक्ष अजय कोराणे, अनिल कानड़े उपस्थित थे. अतिथियों का स्वागत अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत ने किया. कोराणे ने कार्यक्रम की प्रस्तावना की. गौरी चोरगे, आसावरी जाधव ने अतिथियों का परिचय करवाया. आरती परीट ने सूत्रसंचालन तथा वंदना कुसालकर ने आभार प्रकट किए. इस समय इंजीनियरिंग एसोसिएशन के पदाधिकारी, सदस्य, शिक्षक, पर्यावरण प्रेमी नागरिक तथा छात्र-छात्राएं बड़ी संख्या में उपस्थित थे


लोकमत

## वसंत भोसले यांचे प्रतिपादन : 'दत्तकविधानाची हकीकत' पुस्तकाचे प्रकाशन, तत्कालीन परिस्थितीची यथार्थ मांडणी

# राजर्षी शाहू यांच्या विचारांत समृद्ध विकासाचे मॉडेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराज आधुनिक विकासाचे जनक होते. त्यांनी समाजाच्या प्रगतीचा पाया रचला. जागतिकीकरण, दळणवळण, विकासाचे महत्त्व आपण आता ओळखतो; पण महाराजांनी जगात जे जे चांगले, ते ते कोल्हापुरात आणले. त्यांनी संस्थानाच्या विकासाचे रोल मॉडेल उभारले. आज शिक्षण-उद्योगांची झालेली अधोगती, मंदावलेला विकास, सामाजिक दरी, जातींचे राजकारण अशा परिस्थितीत शाहूंचा नुसता जयजयकार करण्यापेक्षा त्यांच्या विचारांनी गेलो तर देशाचे अनेक प्रश्न सुटतील, असे प्रतिपादन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी शुक्रवारी येथे केले.


नसीर अत्तार

कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात शुक्रवारी 'राजर्षी शाहू महाराजांच्या दत्तकविधानाची हकीकत' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर डॉ. अरुण भोसले, 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, डॉ. बी. डी. खणे, डॉ. विलास पोवार उपस्थित होते.

शाहू स्मारक भवनात सदाशिव महादजी देशपांडे लिखित व प्राचार्य डॉ. विलास पोवार संपादित 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार, करवीर यांच्या दत्तकविधानाची हकीकत १८८५' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे, इतिहासाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले, डॉ. विलास पोवार उपस्थित होते.

### तिसऱ्या शतकात प्रकाशनाची दुर्मीळ घटना

राजर्षी शाहू महाराजांचे दत्तकविधान १७ मार्च १८८४ रोजी झाले. त्यानंतर १८८५ साली या सभारंभास उपस्थित असणारे सदाशिव महादजी देशपांडे यांनी हे पुस्तक लिहिले. पहिल्या आवृत्तीनंतर १३५ वर्षांनी त्याची दुसरी आवृत्ती निघणे ही साहित्याच्या इतिहासातील दुर्मीळ घटना आहे. तिसऱ्या शतकानंतर प्रकाशित झालेले हे पुस्तक म्हणजे शाहूंचे दत्तकविधान. राजशिष्टाचार, ब्रिटिशांचे व्यवस्थापन, संस्थानकालीन जीवन, सामाजिक स्थिती आणि महत्त्वाचे म्हणजे शाहू महाराज समजून घेण्यासाठी हे पुस्तक महत्त्वाचा दस्तावेज असल्याचे वसंत भोसले म्हणाले.

भोसले म्हणाले, शाहू महाराजांनी संस्थानच्या विकासासाठी राधानगरी धरण, रेल्वे, शाहू मिलची स्थापना, जयसिंगपूर व्यापार पेठ, रोमच्या मैदानाप्रमाणे 'खासबाग'ची उभारणी, धार्मिक शिक्षणासाठी वैदिक स्कूल, वेदोक्त प्रकरणानंतर धार्मिक, सांस्कृतिक शोषणाविरोधीचा लढा, बहुजनांच्या शिक्षणासाठी वसतिगृह उभारले. असा हा विकासाची दूरदृष्टी लाभलेला राजा घडला कसा, त्यामागचा विचार काय होता, यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठानेही शाहू संशोधनाचे कार्य व्यापक करावे.

कुलगुरु देवानंद शिंदे म्हणाले, शाहू महाराजांचे दत्तकविधान ही कोल्हापूर संस्थानच्या इतिहासातील संस्मरणीय घटना होय. या घटनेने विकासाची दृष्टी असलेला आणि ती प्रत्यक्षात उतरविणारा राजा मिळाला. दत्तकविधानावर आधारित पुस्तकात हेडमास्तरांनी राज्यकारभाराची पारदर्शक मांडणी केली आहे.

प्रास्ताविकात डॉ. विलास पोवार यांनी शाहू महाराजांशी संबंधित अनेक दस्तऐवज अद्याप प्रकाशात आलेले नाहीत. या दस्तऐवजांची व नोंदींची नव्याने मांडणी करण्याची गरज असल्याचे सांगितले. डॉ. अरुण भोसले, डॉ. बी. डी. खणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, चित्रकार संजय शेलार, चंद्रकांत पोतदार यांचा सत्कार करण्यात आला. ॲड. अजित चव्हाण यांनी आभार मानले.

# ‘दत्तकविधान हकिकत ’मधून शाहूंच्या कार्याचे दर्शन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन


**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

छत्रपती शाहू महाराजांचे दत्तकविधान व तत्कालीन घडामोडी याबाबत सर्वच पुस्तकप्रेमींना मोठे कुतूहल आहे. सुमारे १३५ वर्षांपूर्वी सदाशीव देशपांडे यांनी समतोल साधन पुस्तकाची निर्मिती केली होती, तर आता डॉ. पोवार यांनी लेखन कौशल्य आणि मौलिक रेखाटनाने पुस्तकाची पुनर्निर्मिती केली असून, पुस्तकातून शाहूंच्या कार्याचे दर्शन समाजाला घडणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

श्रीमन् महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तकविधानाची हकिकत या १८८५ रोजी प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी केले आहे. या संपादित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शुक्रवारी शाहू स्मारक येथे पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले होते, तर प्रमुख उपस्थिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, इतिहास संकलन समितीचे डॉ. बी. डी. खणे, माजी इतिहास विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठाचे डॉ. अरुण भोसले यांची होती. स्वागत प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शाहू विचारांची आणि दत्तकविधान हकिकतीची तर्कशुद्ध मांडणी पुस्तकातून करण्यात आली आहे. शाहू विचारांचे आणि कार्याचे निरीक्षण पुस्तकात मांडण्यात आले आहे. व्यवस्था परिवर्तनाला हे पुस्तक उपयोगी ठरेल. डॉ.अरुण भोसले म्हणाले, छत्रपती शाहूंचे जीवनकार्य हा अभ्यासाचा विषय आहे. पोवार यांनी मोठे परिश्रम घेऊन हे पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. डॉ. बी. डी. खणे म्हणाले, आज जे काही छत्रपतींवरील साहित्य उपलब्ध आहे त्याचे संपूर्ण श्रेय शिवाजी विद्यापीठाला जाते. छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य खरोखरच प्रेरणादायी आहे.

दरम्यान, विलास पोवार यांनी पुस्तकाच्या पुनर्निर्मितीसंदर्भात माहिती उपस्थितांना दिली. त्यामध्ये १३५ वर्षांपूर्वीचा हा जुना ठेवा कसा संकलित केला, त्यामध्ये आलेल्या अडचणी याबाबत माहिती दिली. आभार ॲड. अजित चव्हाण यांनी मानले. यावेळी संजय शेलार, चंद्रकांत पोतदार, देवस्थान सचिव विजय पोवार यांच्यासह पुस्तकप्रेमी उपस्थित होते.



**कोल्हापूर : डॉ. विलास पोवार संपादित पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. बी. डी. खणे, अरुण भोसले आदी.** **(छाया : पांडुरंग पाटील)**

पुढारी

# आंतरराष्ट्रीय पातळीवर कौशल्य सिद्ध करा

## गिरिजा पाटील-देसाई; शिवाजी विद्यापीठात कलर्स-२०१७ समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कलर्स विजेत्या क्रीडापटूंनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळविले आहे. त्यांनी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:चे कौशल्य दर्शविण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय नेमबाज, वनाधिकारी गिरिजा संदीप पाटील-देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागातर्फे २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ (कलर्स-२०१७) प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. याप्रसंगी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवून सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल न्यू कॉलेजला २०१७-१८ चे खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी गौरव स्वीकारला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या गुणगौरव समारंभात बोलताना आंतरराष्ट्रीय नेमबाज गिरिजा संदीप पाटील-देसाई, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

गिरिजा पाटील-देसाई म्हणाल्या, जागतिक स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील प्रवाह काय आहेत, याची माहिती खेळाडूंनी करून घ्यायला हवी. त्यासाठी तंत्रज्ञानाचा सदुपयोग करून घ्यावा. येणाऱ्या कालखंडात कारकिर्दीचे योग्य नियोजन करा आणि किती उंच भरारी घ्यायची, हे ठरवून त्या दिशेने झेप घ्या, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा लौकीक देशभरात उंचावण्यात क्रीडापटूंचे योगदान मोलाचे आहे. पारंपरिक खेळांतच नव्हे तर रग्बी, ग्रीको-रोमन कुस्ती, फेन्सिंग अशा विभागाला अपारंपरिक क्रीडा प्रकारांतही त्यांनी यश मिळविले आहे.

यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेता अक्षय देशमुख (तलवारबाजी), खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक विजेती अश्विनी मळगे (वेटलिफ्टिंग), सुवर्ण विजेता ओंकार हंचनाळे (खो-खो), कांस्य विजेती मयुरी देवरे (वेटलिफ्टिंग) यांना गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे कोलंबो (श्रीलंका) येथे झालेल्या आयर्नमन स्पर्धेत (२ कि. मी. जलतरण +१० कि.मी. सायकलिंग+ २१ कि.मी. धावणे) महाराष्ट्रकडून सर्वाधिक जलद वेळ (६ तास १० मि.) नोंदवून फ्रान्स येथील स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या सुप्रिया निंबाळकरला गौरविण्यात आले.

प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. प्रास्ताविक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब उलपे यांनी आभार मानले.

सकाळ

# आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवावा

## वनाधिकारी गिरीजा पाटील-देसाई; विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे खेळाडूंचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत यश मिळविलेल्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवावा, असे आवाहन वनाधिकारी गिरीजा संदीप पाटील-देसाई यांनी आज येथे केले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या (कलर्स-२०१७) सत्कारप्रसंगी वनाधिकारी गिरीजा संदीप पाटील-देसाई, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, संभाजी पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. बाबासाहेब उलपे आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या (कलर्स-२०१७) सत्कारप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

सौ. पाटील-देसाई म्हणाल्या, ''राष्ट्रीय स्तरावर चमक दाखविल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकण्याची जिद्द खेळाडूंच्या मनात जागायला हवी. जागतिक स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील प्रवाह काय आहेत, याची माहिती खेळाडूंनी करून घ्यावी. तंत्रज्ञानाचा सदुपयोग करून घेत स्थानिक मार्गदर्शकांसह जागतिक स्तरावर उपलब्ध प्रशिक्षकांची मदत घेणे आवश्यक आहे. आपल्या कारकीर्दीचे योग्य नियोजन करा आणि किती उंच भरारी घ्यायची, हे ठरवून त्या दिशेने झेप घ्या.''

त्या म्हणाल्या, ''क्रीडापटूंसाठी राज्य तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये पाच टक्के राखीव जागा असतात, त्याचाही लाभ घ्या. त्यासाठी स्पर्धा परीक्षांचा सराव आवश्यक आहे.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''केवळ पारंपरिक खेळांतच नव्हे, तर रग्बी, ग्रीको-रोमन कुस्ती, फेन्सिंग अशा अपारंपरिक असणाऱ्या क्रीडा प्रकारातही विद्यापीठाच्या खेळाडूंनी यश मिळविले आहे. या खेळाडूंना सराव व स्पर्धेदरम्यान विमा संरक्षण योजना, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंना दोन लाख रुपयांचा मदतनिधी अशा अनेक योजना विद्यापीठ राबवित आहे.'' आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक प्रकारांत पाच सुवर्ण, पाच रौप्य व तेरा कांस्य अशी एकूण २३ पदके मिळविणाऱ्या आणि २१ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात सहा सुवर्ण, आठ रौप्य व सात कांस्यपदके प्राप्त करणाऱ्या क्रीडापटूंचा गौरव करण्यात आला.

शिवछत्रपती पुरस्कार विजेता अक्षय देशमुख (तलवारबाजी), खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक विजेती अश्विनी मळगे (वेटलिफ्टिंग), सुवर्ण विजेता ओंकार हंचनाळे (खो-खो), कांस्य विजेती मयूरी देवरे (वेटलिफ्टिंग) यांना गौरविले. त्याचप्रमाणे कोलंबो (श्रीलंका) येथे झालेल्या आयर्नमन स्पर्धेत महाराष्ट्राकडून सर्वाधिक जलद वेळ नोंदवून फ्रान्स येथील स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या सुप्रिया निंबाळकरचा सत्कार झाला. विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संभाजी पाटील उपस्थित होते.

प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब उलपे यांनी आभार मानले.

### न्यू कॉलेजची हॅट्ट्रिक!

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवून सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल दि न्यू कॉलेजला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविले. न्यू कॉलेजने सलग तिसऱ्यांदा हा मान मिळविला. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी हा गौरव स्वीकारला.

लोकमत

## गिरीजा पाटील-देसाई : प्रावीण्यप्राप्त खेळाडूंचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव

# आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी सिद्ध व्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : क्रीडा क्षेत्रातील कारकिर्दीचे योग्य नियोजन करा. किती उंच भरारी घ्यायची, हे ठरवून त्या दिशेने झेप घ्या. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वत:चे कौशल्य दर्शविण्यासाठी सिद्ध व्हा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय नेमबाज व ठाण्याच्या वनाधिकारी गिरीजा पाटील-देसाई यांनी शुक्रवारी येथे खेळाडूंना केले.

सन २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या गुणगौरवाचा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. गिरीजा पाटील-देसाई म्हणाल्या, आंतरविद्यापीठ स्पर्धांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर चमक दाखविल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकण्याची जिद्द खेळाडूंच्या मनात जागली पाहिजे; त्यासाठी जागतिक स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील प्रवाह काय आहेत, त्याची माहिती त्यांनी घ्यावी. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाचा लौकिक देशभरात उंचावण्यात क्रीडापटूंचे योगदान मोलाचे आहे. त्यांना सराव व स्पर्धेदरम्यान विमा संरक्षण योजना, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंना दोन लाख रुपयांचा मदतनिधी, आदी योजना विद्यापीठ राबवीत आहे.

या कार्यक्रमात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक प्रकारात पाच सुवर्ण, पाच रौप्य व १३ कांस्य अशी एकूण २३ पदके मिळविणाऱ्या आणि २१व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०१७ मध्ये सहा सुवर्ण, आठ रौप्य व सात कांस्य अशी एकूण २१ पदके प्राप्त करणाऱ्या क्रीडापटूंना ब्लेझर, स्मृतिचिन्ह, पुस्तक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अक्षय देशमुख, अश्विनी मळगे, ओंकार हंचनाळे, मयुरी देवरे, सुप्रिया निंबाळकर या प्रावीण्य, पुरस्कारप्राप्त खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचा प्रारंभ प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाला. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, छत्रपती पुरस्कार विजेते संभाजी पाटील, आदी उपस्थित होते. प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब उलपे यांनी आभार मानले.

दीपक जाधव



**शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी प्रावीण्यप्राप्त खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय नेमबाज गिरीजा पाटील-देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संभाजी पाटील, पी. टी. गायकवाड, देवानंद शिंदे, डी. आर. मोरे, बाबासाहेब उलपे, जे. एच. इंगळे, आदी उपस्थित होते.**

## सलग तिसऱ्यांदा 'न्यू कॉलेज'ला बहुमान

यावेळी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवून सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल न्यू कॉलेजला सन २०१७-१८चे खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. न्यू कॉलेजने सलग तिसऱ्यांदा हा बहुमान पटकाविला आहे. कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी हा गौरव स्वीकारला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2019
Times of India

# Shivaji university asks colleges to accept govt IDs

## Hall Tickets Of 7k Pupils Full Of Errors

Times News Network

**Kolhapur:** The exam department of Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges to accept government IDs such as pan card, driving license, passport or voter ID card for the students whose hall tickets have been printed with errors.

The circular from the university released on March 27 entails a list of instructions for the principals and directors of the affiliated educational institutions across the division. It stated that many students did not have their photos and signature on their hall tickets due to a technical issue. Such students should be asked to paste a new photo on the respective hall ticket and undersign from a designated authority.

It further added that if any student failed to paste a photo on his/her error-ridden hall ticket, he/she should still be allowed to appear for the exam by checking his government approved ID.

The circular further stated not a single student should be affected because of the error-ridden hall tickets.

When contacted, an official from the exam department said that there must be around 7,000 students of the regular first-year courses and a few pursuing distance education courses, who have been affected due to the error. "The technical glitch has caused the whole issue. The low-resolution size of the photo and signature, which have to be uploaded online, have caused this uproar. Many students find difficulty in uploading the low-resolution photo, as a result of which the photos do not get printed in the hall tickets," said the official.

The official added that the issue was being rectified and that the same problem would not recur in the next semester as the resolution size would be increased. The sememester exam started from March 26.

# शाहूंचे दत्तकविधान ऐतिहासिक क्षण

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मत

'राजर्षी शाहू महाराज यांच्या दत्तक विधानामुळे करवीर संस्थानास बुद्धिमान राजा मिळाला. करवीर संस्थानासाठी तो ऐतिहासिक क्षण होता. दत्तक विधान कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहिलेले सदाशिव महादजी देशपांडे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे मूल्य मोठे आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे शुक्रवारी पार पडलेल्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते.

राजर्षी शाहू महाराज यांचा दत्तक विधान कार्यक्रम १७ मार्च १८८४ मध्ये पार पडला. त्यासाठी संस्थानातील हेड मास्तर सदाशिव महादजी देशपांडे उपस्थित होते. त्यांनी सर्व कार्यक्रम जवळून पाहिले होते. करवीर संस्थानातील महत्त्वाच्या घडामोडींचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेले देशपांडे यांनी 'श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या दत्तक विधानाची हकीकत सन १८८५' हे पुस्तक लिहिले. त्याची पहिली आवृत्ती १८८५ मध्ये प्रकाशित झाली. प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी या पुस्तकाचे नव्याने संपादन केले असून, शुक्रवारी डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'पुस्तकाचे लेखक देशपांडे स्वतः दत्तकविधान कार्यक्रमासाठी उपस्थित होते, त्यामुळे एक शिक्षक आणि इतिहास लेखक यांच्या नजरेतून तयार झालेले पुस्तक इतिहासातील महत्त्वाचा दस्तऐवज आहे. इतिहास, भाषा, समाजशास्त्र, आर्थिक व्यवहार, राज्य कारभार, तत्कालीन दरबारी रीतीरिवाज, संस्कृती यांचे उत्तम निरीक्षण पुस्तकात उतरले आहे. यामुळेच या पुस्तकाचे मूल्य मोठे आहे. हा क्षण संस्थानासाठी ऐतिहासिक ठरला.'

डॉ. अरुण भोसले म्हणाले, 'शाहू महाराजांच्या इतिहासाचा अभ्यास, संशोधन आणि लेखन यासाठी विद्यापीठाच्या इतिहास विभागाने मोठे काम केले आहे. अनेक दुर्मिळ अभ्याससाधने या विभागाने जतन केली आहेत.' इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे यांनी देशपांडे यांच्या पुस्तकाची वैशिष्ट्ये मांडली. ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. ध्रुव प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले. यावेळी पुस्तकाचे संपादक डॉ. पोवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांच्यासह दिलीप पवार, शिवाजीराव परुळेकर, छाया पोवार, आदी उपस्थित होते. डॉ. रश्मी पेंडुरकर आणि अस्मिता चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. अजित चव्हाण यांनी आभार मानले.

# शाहीर आझाद नायकवडी यांना पीएच.डी.



**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** नामवंत शाहीर आझाद पापालाल नायकवडी यांना शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. प्रदान केली. नायकवडी यांनी संगीत विषयातून 'आत्माराम पाटील यांच्या शाहिरी आणि इतर रचनांचा सांगीतिक विचार' या विषयावर प्रबंध सादर केला होता. शाहिरी कलेवर पीएच.डी. करणारे ते महाराष्ट्रातील पहिले संशोधक ठरले आहेत. नायकवडी हे शाहिरी कला जोपासण्यासह ताराराणी विद्यापीठाच्या उषाराजे हायस्कूलमध्ये पूर्णवेळ संगीत शिक्षक म्हणून काम करतात. त्यांना वडील शाहीर पापालाल नायकवडी, आई प्रमिला नायकवडी आदींचे मार्गदर्शन लाभले. डॉ. भारती वैशंपायन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रबंध सादर केला.